## <u>नियमित दिवाणी दावा क्र.३२८/२०२३</u>
## <u>निशाणी क्र. ३३ वरील आदेश</u>
( CNR No.MHSO220048622023 )

वादीने प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २६ नियम ९ अन्वये कोर्ट कमिशनरची नियुक्ती करणेबाबत दाखल केला आहे.

२. वादीचे कथन असे की, विशेष अधीक्षक, भूमि अभिलेख , करमाळा यांची कोर्ट कमिशनर म्हणून नेमणूक होऊन त्यांचे मार्फत वादी यांचा गट क्र.३९६/२/अ/२ क्षेत्र ०.८१ आर या गट क्रमांक व प्रतिवादी यांची गट क्र.३९६/२/अ/१ ची जमीन या संपूर्ण गटाची कोर्ट कमिशनर मार्फत मोजणी करुन गटाचे हद्दीखुणा दाखवणेत यावेत व वादी व प्रतिवादी यांचे दोन्ही जमिनीची मोजणी करुन कोणी कोणाचे गटात किती क्षेत्रात अतिक्रमण केले ते दाखवणेत यावे व तसा मोजणी नकाशा व मोजणी रिपोर्ट मिळणेकामी सदरचा अर्ज दाखल केला आहे. वादीने सदरचा दावा प्रतिवादी यांनी वादीचे गट क्र.३९६/२/अ/२ पैकी क्षेत्र खाजगीत मोजणी केले असता ०० हे २२ आर क्षेत्राचे अतिक्रमण केलेचे दिसून आले मुळे सदरचा दावा अतिक्रमण क्षेत्राचा कब्जा मिळणेकामी दावा आणला आहे. सदर वादीचे पती यांनी प्रतिवादीचे वडिलांकडून व प्रतिवादीकडून खाजगीत मोजणी करुन जमीन खरेदी केली होती. त्यावेळी मुळ गट क्र.३९६/२ मधील खरेदी केले. दोघांचे संमतीने गट फोड केली व त्यास वेगवेगळे गट फोड करताना वादीचे पती दत्तात्रय तुकाराम जाडकर याने त्याची पत्नी वादी हिचे नावे गट विभाजनानंतर नाव नोंद केली.

३. प्रतिवादी यांनी त्यांचे हिश्याप्रमाणे गट क्र.३९६/२/अ/१ व गट क्र.३९६/२/ब खरेदी घेतलेनंतर त्यांनी दोन तीन वर्षानंतर सन २०१९ साली प्रतिवादी क्र.१ ते ४ यानी त्यांचे जमिनीचे दक्षिण उत्तर चालीचे बांध टाकून जमिनीचे आपसात खाजगी मोजणी दोऱ्या टाकून वहिवाटीचे बांध टाकले त्यावेळी प्रतिवादीने नियमाप्रमाणे मोजणी न करता खाजगीत दोऱ्या टाकून मोजणी केली. त्यावेळी वादीचे दावा जमिनीत जो जुना बांध पूर्व पश्चिम चालीचा बांध दक्षिण बाजुने उत्तर बाजुकडे वादीचे जमिनीत १० ते १२ फुट अंतरावर बांध सरकवला आहे, त्यावेळी सदरचे अतिक्रमण प्रतिवादीने केले म्हणून सदर प्रतिवादीने अतिक्रमण केले त्या क्षेत्राचा कब्जा मिळणेचा दावा वादीने प्रतिवादी विरोधात आणला आहे.

वादी व प्रतिवादी यांचे दोन्ही गट जमिनीची मोजणी करुन मोजणी अंती कोणी कोणाचे जमिनीत किती क्षेत्राचे अतिक्रमण केले ते नकाशात दाखवून त्याप्रमाणे नकाशासह अहवाल दाखल करणेबाबत आदेश होण्याची विनंती केली. वादी कोर्ट कमिशनरची फी भरणेस तयार आहे.

४. प्रतिवादी यांनी प्रस्तुत अर्जास म्हणणे दाखल केले नाही.

५. प्रस्तुतचा अर्ज, दावा, कैफियत, दाखल कागदोपत्री पुरावा तसेच वादी यांचा युक्तीवाद ऐकला.

६. प्रस्तुतचा दावा हा वादीने दावा मिळकतीवर असलेल्या अतिक्रमणाचा कब्जा मिळणेकरीता दाखल केला आहे. चिखलठाण येथील गट क्र.३९६/२/अ/१ व गट क्र.३९६/२/अ/२ खरेदी घेतलेनंतर दोन तीन वर्षांनी मे महिन्यात सन २०१९ साली प्रतिवादी क्र.१ ते ४ यांनी त्यांचे जमिनीचे दक्षिण–उत्तर चालीचे बांध टाकून जमिनीचे भाग पाडून आपसात वहिवाटीसाठी बांध टाकले. त्यावेळी नियमाप्रमाणे मोजणी न करता खाजगीत दोऱ्या टाकून जमिनीची मोजणी केली व त्या सुमारास वादीचे दावा जमिनीत व प्रतिवादीचे जमिनीमध्ये जो जुना पूर्व–पश्चिम चालीचा बांध दक्षिण बाजुने उत्तर बाजुकडे वादीचे जमिनीत अंदाजे १० ते १२ फुट अंतरावर बांध सरकला असल्याचे कथन आहे. सदरचे कथनाप्रमाणे प्रतिवादी क्र.१ ते ४ यांनी बांध टाकून जमिनीचे भाग पाडून वहिवाटीसाठी बांध टाकले किंवा नाही याबाबी वादी व प्रतिवादींच्या मिळकतीची मोजणी झाल्यानंतर स्पष्ट होतील. सदरचा अर्ज मंजूर केल्यास प्रतिवादींच्या कथनास कोणतीही बाधा येणार नाही. वादीने प्रस्तुत मोजणी विशेष अधीक्षक, भूमी अभिलेख, करमाळा यांचेमार्फत करुन मिळणेची विनंती केली आहे. परंतु करमाळा येथे उप अधीक्षक, भूमी अभिलेख, कार्यालय उपलब्ध आहे. त्यामुळे प्रस्तुत मोजणीचे आदेश उप अधीक्षक भूमी अभिलेख करमाळा यांना देणे न्यायोचित्त ठरते. प्रस्तुतचा अर्ज हा दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २६ नियम ९ च्या कक्षेत येत आहे. करीता पुढील आदेश पारित करण्यात येत आहे.

## आदेश

१. अर्ज अंशतः मंजूर करण्यात येतो.

२. उपअधीक्षक, भूमी अभिलेख, करमाळा यांची न्यायालयीन आयुक्त म्हणून नेमणूक करण्यात येते. संबंधीत अधिकाऱ्याने अतितात्काळ मोजणी फी घेवून प्रशिक्षीत मोजणीदार यांचे मार्फत मौजे चिखलठाण ता.करमाळा, जि.सोलापूर

येथील वादीचा गट क्र.३९६/२/अ/२ व प्रतिवादीचा गट क्रमांक ३९६/२/अ/१ या गटांची मोजणी करण्याबाबत आदेशीत करण्यात येते.

३. संबंधित लिपिकास आदेशीत करण्यात येते की, आदेशाची प्रमाणित प्रत पत्रासह मोजणी फी करीता उपअधीक्षक, भूमी अभिलेख, करमाळा यांना तात्काळ पाठवावी.

४. वादीने अति तात्काळ मोजणी फी उपअधीक्षक , भूमी अभिलेख, करमाळा यांचे कार्यालयात भरुन आठ दिवसांत अहवाल सादर करावा तसेच आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करावी.

५. न्यायालयीन आयुक्तांनी मौजे चिखलठाण ता.करमाळा, जि.सोलापूर येथील वादी व प्रतिवादी यांच्या गटांची वादी व प्रतिवादी यांचे समक्ष मोजणी करुन अतिक्रमण आहे किंवा नाही तसेच अतिक्रमण असेल तर ते कोणत्या गटधारकाने अतिक्रमण केले आहे हे दर्शवून तसेच अतिक्रमीत क्षेत्र वेगळया रंगाने दर्शवून तसा नकाशा तयार करुन दोन्ही गटांच्या हद्दीखुणा निश्चित करुन तसेच चिन्हाकिंत करुन सविस्तर मोजणी अहवाल नकाशासह न्यायालयात एक महिन्याच्या आत सादर करावा.

६. संबंधित लिपिक यांना आदेशित करण्यात येते की, वादीने मोजणी फी भरल्याची पावती तसेच आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता केल्याबरोबर भूमी अभिलेख कार्यालय यांचेकडे मोजणीकरीता रिट त्वरीत पाठवावी.

७. वादी व सर्व प्रतिवादींनी मोजणी करिता तालुका भूमी अभिलेख कार्यालय, करमाळा यांचेकडे स्वतः संपर्क साधून मोजणी विहित मुदतीत करण्याकरिता सहकार्य करावे व मोजणी वेळी हजर रहावे.

८. वादीने आदेशाची पूर्तता त्वरीत न केल्यास अर्ज नस्तीबंद समजण्यात येईल.

EKHE MEENA PRAKASH
Digitally signed by EKHE MEENA PRAKASH
Date: 2024.05.09 16:30:51 +0530

स्थळ – करमाळा
दिनांक – ०९.०५.२०२४

(सौ. मीना प्र. एखे )
दिवाणी न्यायाधीश व.स्तर, करमाळा

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of the this P.D.F file Order/Judgment are same word to word, as per the original order/ judgment

Name of Stenographer : B.R.Kondekar
Court Name : Civil Court Senior Division, Karmala
Date 09.05.2024

Order/Judgment signed
by the Presiding Officer on : 09.05.2024

Order uploaded on : 09.05.2024